# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०४/०२/२०२५

## प्रेसनोट

दि.०४ फेब्रुवारी हा दिवस **"जागतिक कर्करोग दिवस"** म्हणून साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक सूचना नुसार दि.४ फेब्रुवारी,२०२५ हा दिवस "United by Unique या थिम वर आधारीत आहे.

सदर थिमच्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत खालील रूग्णालयामध्ये कर्करोग तपासणी व निदान करण्याकरीता शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेचे मा.आयुक्त महोदय श्री.अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त श्री. संजय हेरवाडे, उप आयुक्त श्री.समिर भूमकर व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.भक्ती चौधरी यांनी वैद्यकीय अधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

१) सर.डी.एम.पेटीट रूग्णालय, वसई
२) विजयनगर तुळींज रूग्णालय, नालासोपारा
३) श्री जिवदानी देवी रूग्णालय, चंदनसार
४) बोळींज सामान्य रूग्णालय, विरार (प)
५) सोपारा सामान्य रूग्णालय, नालासोपारा (प)
६) जुचंद्र सामान्य रूग्णालय, नायगाव

१) शिबिरा अंतर्गत रूग्णांची कर्करोगाकरीता मोफत मुख तपासणी, स्तन तपासणी व गर्भाशय मुख तपासणी करण्यात आली. यामधील संशयित रूग्णांची PAP Smear, Mammography करण्यात आली आहे.
२) तरी वरील शिबिरामध्ये एकूण ९६९ रूग्ण यांची तपासणी करण्यात आली असून यामधील ६६ महिलांची PAP Smear करण्यात आले
३) नागरी आरोग्य केंद्रांतर्गत कर्करोगाबाबत ओपीडी मध्ये आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच रॅली मार्फत जनजागृती करण्यात आली.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका